**सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षापासून +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय (एच.एस.सी. व्होकेशनल) अभ्यासक्रमाच्या नवीन/ अधिकच्या तुकडयांना कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यांस मान्यता देणेबाबत....**

महाराष्ट्र शासन
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-२०१२/४३९/(२०२ /१२)/व्यशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १९ ऑक्टोबर, २०१२

**संदर्भ** : १. आयुक्त, कौशल्य विकास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक ५/व्हीओसी/२०१२-१३/४५ दिनांक २० जुन, २०१२
२. संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक ५/व्हीओसी/२०१२-१३/७७, दिनांक २ जुलै, २०१२
३. संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक ५/व्हीओसी/२०१२-१३/४५, दिनांक ३०जुलै, २०१२
४. संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक ८/व्हीओसी/२०१२-१३/४५ दिनांक २९ ऑगस्ट, २०१२.
५ शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.व्हीओसी-२००८/(११६/०८)/व्यशि-३, दिनांक २ मार्च,२००९.

**प्रस्तावना :-** केंद्र शासनाच्या १९८६ च्या नविन शैक्षणिक धोरणानुसार + २ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षण देऊन जास्तीत जास्त युवकांना रोजगार/स्वयंरोजगार करण्यास प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने राज्यात १९८८-८९ पासून ७० % व्यवसाय शिक्षण व ३० % सामान्य शिक्षण अंर्तभूत असलेले किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यात आले. हे अभ्यासक्रम प्रात्यक्षिकाभिमुख असल्याने विद्यार्थांना संबंधित व्यवसायाशी निगडीत किमान कौशल्य प्राप्त करुन स्वत:चा उद्योग सुरु करावा अथवा औद्योगिक आस्थापनामध्ये नोकरी करावी आणि उच्च शिक्षणाकडे जाणारा लोंढा कमी व्हावा हा या योजनेचा उद्देश आहे. या अभ्यासक्रमाचे किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम हे नाव संदर्भाकीत अनु क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये बदलण्यात आले असुन ते उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C.Vocational) असे करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत तंत्र/वाणिज्य/कृषी/मत्स्य/अर्धवैद्यकीय/गृहशास्त्र या ६ गटातील एकूण ३० व्यवसाय अभ्यासक्रम राज्यातील ५३ शासकीय, ९२४ अशासकीय अनुदानित व ५३१ अशासकीय विना अनुदानित संस्थामध्ये राबविण्यात येत आहेत. सदर व्यवसाय अभ्यासक्रमाची वाढती मागणी लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/नविन तुकडया कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्त्वावर सुरु करणेसाठी इच्छूक संस्थांनी अर्ज करण्यासंबंधी संचालक, व्यवसाय शिक्षण यांनी जाहीरात विज्ञापीत केली होती. त्यानुसार संस्थांकडुन प्राप्त झालेल्या अर्ज/प्रस्तावांची संचालनालयस्तरावर छाननी करण्यात आली. त्यानुसार संचालनालयाने शासनास शिफारस केलेल्या प्रस्तावातील, विहित निकष/मानकांची पुर्तता करणाऱ्या ३ अशासकीय संस्थांमध्ये +२ स्तरावरील उच्च माध्यमिक (H.S.C.Vocational) व्यवसाय अभ्यासक्रमाच्या ७ नविन/अधिकच्या तुकडयांना कायम विनाअनुदानित तत्वावर शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या ३ अशासकीय संस्थांमधील ७ नविन/अधिकच्या तुकडया (सोबतच्या प्रपत्र-**अ** मध्ये दर्शविल्याप्रमाणे) **कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर** शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून सुरू करण्यास खालील अटीं व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यांत येत आहे. त्यामुळे याचा लाभ राज्यातील १४० विद्यार्थांना होणार आहे.

**अटी व शर्ती**

१. सबंधित संस्थेस माध्यमिक शाळा संहितेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

२. मान्य अभ्यासक्रमांच्या नविन/अधिकच्या तुकडया सुरू करण्यांस कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यांत येणार नाही.

३. मान्य अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांना शासन/संचालनालय/संचालनालयाच्या अखत्यारीतील संबंधित कार्यालयें यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेस बंधनकारक राहील.

५. **"कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळालेले +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम "** असा सूचना फलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सूचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांची संख्या व मंजूर प्रवेश क्षमता याचा उल्लेख करण्यात यावा.

६. संबंधित संस्थेने मंजूर अभ्यासक्रमासाठी मानकानुसार आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन तात्काळ अभ्यासक्रम सुरु करावेत.

७. सदर अभ्यासक्रमांना कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यांत आल्यामुळे या अभ्यासक्रमाकरीता संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा/वेतन व तदनुषंगिक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संबंधित संस्थेची राहील. याबाबत शासन कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

८. मंजूर अभ्यासक्रमांकरीता आवश्यक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, त्यांची किमान शैक्षणिक अर्हता, अनुभव याबाबत संस्थेने महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदींनुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

९. भविष्यात सदरचे अभ्यासक्रम बंद करण्याबाबत, किंवा त्यात काही बदल करण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्यास तो विनाअट, विनाविलंब संस्थेने अंमलात आणणे आवश्यक राहील.

१०. अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकडयांमधील प्रवेशाकरीता, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सामाजिक/समांतर आरक्षण व इतर नियमांचे संस्थेने काटेकोरपणे पालन करावे व गुणानुक्रमे प्रवेश देण्यांत यावेत.

११. अभ्यासक्रमांना मंजूरी मिळाल्यानंतर सदर अभ्यासक्रम संस्थेत सुरू केल्याबाबतची माहिती संस्थेने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळास तात्काळ द्यावी त्याबाबतची अनुषंगिक कार्यवाही करावी.

१२. मान्यता देण्यांत आलेल्या अभ्यासक्रमाच्या नविन/अधिकच्या तुकडयांची प्रवेश क्षमता प्रती तुकडी २० असून, शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ मध्ये मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास अशा तुकडया सुरू ठेवण्याकरीता संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिका-यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सलग तीन शैक्षणिक वर्षामध्ये मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर अभ्यासक्रमाची तुकडी बंद करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

१३. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंर्तभूत करण्याचे अधिकार शासनाचे राहतील.

१४.+२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी संचालक (व्यवसाय शिक्षण) यांचेकडून स्थानिक स्तरावर समिती नेमुन समितीच्या निरीक्षणानुसार संचालनालयाच्या परवानगीने प्रवेश देण्यात यावेत.

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये मान्यता दिलेल्या सोबतच्या यादीतील किती संस्थांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरु केले, अभ्यासक्रम निहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण यांनी शासनास दिनांक ३१.१०.२०१२ पर्यंत सादर करावी.

हा शासन निर्णय राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असुन त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१२१०१९१६५०३४५४०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

( दि.ल.राशिवडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) आयुक्त कौशल्य विकास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई -१
२) संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई -१
३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, (शालेय शिक्षण विभाग),मुंबई/पुणे/नाशिक/कोल्हापूर/लातूर/नागपूर/अमरावती/औरंगाबाद (यांचेकडे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनायामार्फत)
४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई /नाशिक/ पुणे/अमरावती/नागपुर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत.)
५) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (संचालनालयामार्फत)
६) संबंधित अशासकीय संस्था (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत- त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सर्व संबंधित संस्थांना अवगत करावे.)
७) मा. मंत्री (उ व तं.शि) यांचे खाजगी सचिव
८) मा. राज्यमंत्री (उ व तं.शि) यांचे खाजगी सचिव
९) निवड नस्ती (व्यशि-४)

C:\Documents and Settings\admin\Desktop\HSC Vocational.doc

98

C-99

शासन निर्णय क्र. व्हीओसी-२०१२/४३९/प्र.क्र.२०२/व्यशि-४, दिनांक १९ ऑक्टोंबर,२०१२

**सोबतचे प्रपत्र -अ**

**शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून मान्यता देण्यात येणाऱ्या +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव व तुकडयांची संख्या.**

| विभाग | अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून देण्यात येणाऱ्या +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे नाव तुकडयांची क्षमता. | |
|---|---|---|---|---|
| | | | अभ्यासक्रमाचे नाव | मंजूर तुकडयांची संख्या (प्रती तुकडी प्रवेक्ष क्षमता २० विद्यार्थी ) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | जिल्हा- मुंबई उपनगर | | | |
| मुंबई | १ | स्वामी विवेकान्द ज्युनिअर कॉलेज ७८, सिंधी सोसायटी, चेंबूर मुंबई- ७१. | कॉम्प्युटर टेक्निक्स १-तुकडी | १ |
| | २ | कल्याण होलसेल मर्चट एज्युकेशन सोसायटी संचलित लक्ष्मण देवराम सानोवणे कॉलेज, कल्याण. | कॉम्प्युटर टेक्निक्स १-तुकडी | १ |
| | | | मल्टीमिडीया इंटरनेट टेक्नॉलॉजी- १-तुकडी | १ |
| | | | मार्केटिंग ॲण्ड सेल्समनशिप -१ तुकडी | १ |
| | | | ट्रॅव्हल्स ॲण्ड टुरिझम १-तुकडी | १ |
| | | | बॅकिंग -१ तुकडी | १ |
| | जिल्हा -ठाणे. | | | |
| | ३ | विद्या शिक्षण प्रसारक संस्था ठाणे संचलित शंभुराजे कनिष्ठ महाविद्यालय माझी आई शाळा घोडबंदर रोड, पातलीपाडा, ठाणे. | इन्शुरन्स- १ तुकडी | १ |
| | | | एकुण तुकडया | ७ |

*************

21/11/2012

C:\Documents and Settings\admin\Desktop\HSC Vocational.doc

(100)